# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☏ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail** – ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२०/ ७८८ दिनांक : 12 FEB 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था
पुणे विभाग

विषय – करिअर ॲडव्हान्समेंट योजनेतंर्गत वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण /उजळणी वर्ग पूर्ण करण्याच्या अटी व शर्तीमधून सूट मिळण्याबाबत ...

संदर्भ – मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/कॅस/२०२० /७९ दिनांक ०७/०२/२०२०

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे . सदर पत्रांत नमूद केल्याप्रमाणे सध्या आपल्या आस्थापनेवर कार्यरत असणा-या (कंत्राटी व हंगामी सेवा नियमित झालेल्या) अध्यापकाचीं उपरोक्त विषयांकित माहिती Microsoft Excel Worksheet- Sakal Marathi मध्ये तयार करुन दिनांक १५/०२/२०२० पर्यंत थेट संचालनालयांस सादर करावी. तसेच सदर माहितीची प्रत या कार्यालयांस est.ropune@gmail.com या मेलवर सादर करावी.

सोबत - संदर्भिय पत्र

१२/२/२०२०
प्र.सहसंचालक, करिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ०२२-६८५९७३४३ /३२४ फॅक्स - २६९२१०२.

e-mail: desk4a@dtemaharashtra.gov.in Internet: http / www. dte.org.in


कालमर्यादीत
१५ फेब्रुवारी, २०२०

क्रमांक :- ४ अ/आस्था/कॅस/२०२०/७८
दिनांक :- 07 FEB 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

विषय :- करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण/ उजळणी वर्ग पूर्ण करण्याच्या अटी व शर्तीमधून सूट मिळण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. संकीर्ण-१११९/(१५५/१६)/तांशि-२, दि.१४/०१/२०२०

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय पदवी व पदविका संस्थांतील हंगामी / कंत्राटी अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत. सदर अध्यापक हंगामी / कंत्राटी पध्दतीने कार्यरत असल्याने त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी लाभ अनुज्ञेय करण्याकरीता आवश्यक असलेल्या प्रशिक्षण/ उजळणी वर्गापासून सूट मिळण्याबाबतची विनंती संचालनालयास केली होती. त्याअनुषंगाने संचालनालयाच्या दि.०१/०२/२०१७ व २१/०६/२०१८ पत्रान्वये शासनास धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये सदर अध्यापकांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या तरतूदीनुसार प्रशिक्षण/ उजळणी वर्गातून सूट दिल्यास किती आर्थिक भार येईल याबद्दल माहिती सादर करण्यास निर्देशित केलेले आहे.

संदर्भाधीन शासन पत्रातील निर्देश विचारात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय पदवी व पदविका संस्थांतील ज्या अध्यापकांना प्रशिक्षण / उजळणी वर्गापासून सूट देऊन वरिष्ठ / निवड श्रेणी अनुज्ञेय करावयाची आहे, अशा अध्यापकनिहाय येणारा आर्थिक भार खालील प्रपत्रात सादर करावा. तसेच काही अध्यापकांनी अद्यापही प्रशिक्षण व उजळणी वर्ग पूर्ण केले नाहीत त्यांनासुध्दा सूट दिल्यानंतर येणारा आर्थिक भार सादर करावा.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
12 FEB 2020
आवक क्र. 1419

| अ.क्र. | कार्यरत संस्थेचे नाव | अध्यापकाचे नाव | विद्याशाखा | वरिष्ठ श्रेणी लागू होण्याचा दिनांक | वरिष्ठ श्रेणी लागू केल्यानंतर येणारा आर्थिक भार | निवड श्रेणी लागू होण्याचा दिनांक | निवड श्रेणी लागू केल्यानंतर येणारा आर्थिक भार | एकूण आर्थिक भार (६+८) | सातव्या वेतन आयोगानुसार येणारा आर्थिक भार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

सदरचा आर्थिक भार हा पाचव्या/ सहावा व सातवा वेतन आयोगानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीनुसार परिगणित करण्यात यावा. सदरची माहिती १४ फेब्रुवारी, २०२० पर्यंत Sakal Marathi या फॉन्ट मध्ये New Microsoft Excel Worksheet या नमुन्यातील विहित पत्रात पदवी संस्थांची माहिती कार्यासन क्रमांक ४ व पदविका संस्थांची माहिती कार्यासन क्रमांक ४ अ कडे पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच एक प्रत या संचालनालयाच्या desk4a@dtemaharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावर सुध्दा पाठविण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई